# जिल्हा निवड समिती जिल्हा परिषद नंदुरबार

## (जाहिरात क्रमांक १/२०१४)

## अनुसुचित कार्यक्षेत्रा अंतर्गत पदभरतीची जाहिरात

**आरोग्य सेवक(पुरुष- ५०% हंगामी क्षेत्र फवारणी कर्मचारी मधून) ,आरोग्य सेवक (महिला) (आरोग्य विभाग), कंत्राटी ग्रामसेवक(ग्रामपंचायत विभाग) व  पर्यवेक्षिका अंगणवाडी सेविकांमधुन निवडीने भरावयाची पदे (एकात्मिक बालविकास सेवा योजना) अनुसुचित कायक्षेत्रा अंतर्गत पदभरतीची जाहिरात**

---

उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मुंबई यांचेकडील शासन पत्र क्र.एपिटी/ २०१४/ प्र.क्र. ४८/आस्था-८ मुंबई दि.१२/०८/२०१४ व उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्र.एपिटी/ २०१४/ प्र.क्र. १५३/आस्था-८ मुंबई दि.०५/०८/२०१४ अन्वये उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्र.एपिटी/ २०१४/ प्र.क्र. १३९/आस्था-८ मुंबई दि.०५/०७/२०१४ मध्ये विहित करुन देण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार तसेच नंदुरबार जिल्हयातील आदिवासी कार्यक्षेत्रापैकी अनुसुचित कार्यक्षेत्रात समाविष्ट **धडगांव, अक्कलकुवा, तळोदा, नवापूर, नंदुरबार, शहादा (आदिवासी कार्यक्षेत्र),** अनुसुचित कार्यक्षेत्रातील **मा. राज्यपाल महोदय, यांचे कार्यालयाकडुन निर्गमित केलेल्या दि ०९ जुन २०१४ च्या अधिसुचनेत  नमुद केल्यानुसार** जिल्हा परिषद, नंदुरबारचे अधिनस्त एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत  अंगणवाडी सेविकांमधुन `पर्यवेक्षिका` आरोग्य विभागातील `आरोग्य सेवक(पुरुष- ५०% हंगामी क्षेत्र फवारणी कर्मचारी मधून)`, `आरोग्य सेवक (महिला)`, ग्रामपंचायत विभागाकडील `कंत्राटी ग्रामसेवक` ही पदे नंदुरबार जिल्हयाचे अनुसूचित कार्यक्षेत्रातील  (The Scheduled Area) रिक्त पदे व माहे एप्रिल 2015 अखेर रिक्त होणाऱ्या संभाव्य पदे विचारात घेवून भरतीकरीता ``नंदुरबार जिल्हयाचे अनुसूचित क्षेत्रातील`` अर्हताधारक पात्र उमेदवारांकडून खालील पदांकरीता विहीत शुल्क भरुन ऑनलाईन पध्दतीनेच **www.zpndbexam14.org** या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यांत येत आहेत. सदर ऑनलाईन अर्ज भरण्याची  **दिनांक-01/09/2014** रोजी **सकाळी 10.00** वाजेपासून सुरु होवून  अंतिम मुदत  **दि.20/09/2014** रोजी **सायंकाळी 05.30** पर्यंत असेल.

## जि.प.नंदुरबार अंतर्गत सरळसेवा भरती- नोव्हेंबर २०१४  भरावयाच्या पदांची नावे व संख्या

| पद क्र. | सामाजिक प्रवर्ग | एकुण पदे | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भुकंप-ग्रस्त | अंशकालीन कर्म. | अपंग | सर्व-साधारण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **पर्यवेक्षिका (जिल्हा तांत्रीक सेवा वर्ग-३ अंगणवाडी सेविकेतुन निवडीने भरावयाचे)** | | | | | | | | | | |
| | अनु. जमाती | २ | २ | ० | ० | ० | ० | ० | एकुण २ पदांपैकी १ पद अल्पदृष्टी अपंगासाठी आरक्षीत | ० | |
| २ | **आरोग्य सेवक (पुरुष) (५० % हंगामी क्षेत्र फवारणी कर्मचारी मधुन )** | | | | | | | | | | |
| | अनु. जमाती | २१ | ० | ३ | १ | १ | ० | २ | एकुण २१ पदामध्ये २ पदे (कर्णबधीर/ मुकबधीर) किंवा अल्पदृष्टी) | **१४** | माजी सैनिक आरक्षणांत मागील दोन जाहिरातीत उमेदवार उपलब्ध न झाल्याने तिसऱ्यांदा |
| ३ | **आरोग्य सेवक (महिला)** | | | | | | | | | | |
| | अनु. जमाती | **१५** | **०** | **०** | **१** | **०** | **०** | **२** | **०** | **१२** | |
| ४ | **कंत्राटी ग्रामसेवक** | | | | | | | | | | |
| | अनु. जमाती | **२१** | **६** | **३** | **१** | **१** | **०** | **२** | एकुण २१ पदामध्ये १ पद अल्पदृष्टी अपंग प्रवर्गासाठी आरक्षीत आहेत. | **८** | |

### अनुसुचित कार्यक्षेत्रात नंदुरबार जिल्ह्यात रिक्त असलेल्या पदांचा तपशिल

| अ. क्र. | पदाचे नाव | अनुसूचित कार्यक्षेत्र तालुकानिहाय रिक्त गावांची नावे | | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | धडगांव | अक्कलकुवा | तळोदा | नंदुरबार | नवापूर | शहादा | |
| १ | पर्यवेक्षिका (जिल्हा तांत्रीक सेवा वर्ग-३ अंगणवाडी सेविकेतुन निवडीने भरावयाचे) | तलई- १ पद ए.बा.वि.से.यो. खुटांमोडी | - | - | - | धनराट- १ पद ए.बा.वि.से.यो. नवापूर | - | |
| २ | आरोग्य सेवक (पुरुष) (५० % हंगामी क्षेत्र फवारणी कर्मचारी मधुन) | २ पदे १)तालुका-मुख्यालय २)तालुका-मुख्यालय | १ पद १)काठी-भांग्रापाणी | ४ पदे १)तालुका-मुख्यालय २)प्रतापपूर-चिनोदा ३)सोमावल-नळगव्हाण ४)सोमावल-सोमावल | ३ पदे १)तालुका-मुख्यालय २)नटावद-धानोरा ३)ल.शहादे-सुलजानपूर | ७ पदे १)डोगेगांव-शेही २)चिंचपाडा-कळवाण ३)चिंचपाडा-अंजाने ४)खांडबारा- पळशी ५)खांडबारा- मोग्राणी ६)वावडी-वावडी ७)गताडी-विसरवाडी | ४ पदे १)सुलवाडा-ब्राम्हणपूरी २)मंदाणा-असलोद ३)पाडळदा-म्हसावद ४)कहाटूळ-लोंढरे | |

| अ. क्र. | पदाचे नाव | अनुसूचित कार्यक्षेत्र तालुकानिहाय रिक्त गावांची नावे | | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | धडगांव | अक्कलकुवा | तळोदा | नंदुरबार | नवापूर | शहादा | |
| ३ | आरोग्य सेवक (महिला) | १ पद<br>१) रोषमाळ खुर्द-रोषमाळ खुर्द | १ पद<br>१) पिपंळखुटा-हुनाखांब | २ पद<br>१)प्रतापपूर-मोरवड<br>२)सोमावल-राजविहीर | - | ४ पदे १)पळसून-खडकी<br>२)झामणझर-झामणणर ३)उमराण-बिलबारा ४)पळसून-मोग्राणी | ७ पदे १)वाघर्डे-गोगापूर २)वडाळी-वडाळी ३)पाडळदा-म्हसावद ४)प्रकाशा-ओपीडी ५)कहाटूळ-डोगंरगावं ६)शहाणा-दुधखेडा ७)पाडळदा-पाडळदा-१ | |
| ४ | कंत्राटी ग्रामसेवक | - | - | १) छोटाधनपुर<br>२)न्युबन<br>३) दसवड | - | १)श्रावणी<br>२) शेगवे<br>३) कडवान<br>४)मळवाण<br>५) केलपाडा<br>६) सोनारे दिगर<br>७) खेकडा<br>८) आमपाडा<br>९)धनराट<br>१०) तलावीपाडा<br>११)डोगेगाव<br>१२)बोकळझर<br>१३)खोनखडके | १)पिंगाणे<br>२) चिखली बु.<br>३)ओझर्टा<br>४) काथर्दे दिगर<br>५)आडगांव<br>६) बोराडे<br>७) करणखेडा<br>८) कमरावद<br>९) तितरी<br>१०) आकसपुर<br>११) दुधखेडा<br>१२) रामपुर<br>१३) दामळदा<br>१४) शहाणा<br>१५)लंगडीभवानी<br>१६) चिरखान<br>१७) धुरखेडा<br>१८) उजळोद | |

**टिप :- १)** भरती प्रक्रिया / परिक्षा स्थगीत करणे किंवा रद्द करणे, परिक्षेचा प्रकार, समांतर आरक्षणात अंशतः बदल करणे, पदांच्या एकुण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, नंदुरबार हे स्वतःकडे राखून ठेवत आहेत. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

२) भरतीसाठी घोषीत केलेल्या वरील पदांमध्ये जाहिरातीच्या दिनांकास रिक्त पदे व माहे एप्रिल २०१५ पर्यंत नियत वयोमानानुसार सेवा निवृत्तीने रिक्त होणारी पदे यांचा समावेश आहे. त्यामुळे निवड यादीतील ज्या उमेदवारांची संभाव्य रिक्त पदांसाठी निवड होईल त्या उमेदवारांना सदर पदे जसजशी रिक्त होतील तसतसे नियुक्ती आदेश देण्यात येतील. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

३) सदरच्या भरतीच्या नियम/निकषामध्ये भरती पुर्ण होई पर्यंत शासन निर्णय/परिपत्रक/पत्रानुसार बदल होवु शकतो.

**४) महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक ०५ ऑगष्ट २०१४ नुसार राज्यातील अनुसुचित क्षेत्रातील रिक्त पदे भरण्या बाबत सविस्तर सुचना दिलेली आहे. सदर क्षेत्रातील पदांकरीता उमेदवाराने खालील अ,ब व क मध्ये नमुद मार्गदर्शक अटी / शर्तीनुसार अर्ज करावा.**

**अ) केंद्रीय विधी व न्याय मंत्रालय, अधिसुचना क्र. जी.एस.आर.८७६ (ई), दिनांक - ०२/१२/१९८५,**

**ब) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांची क्र. आरबीटीसी/ई-१३०१३(४)/नोटिफिकेशन-१/४७४/२०१४ दिनांक ९-६-२०१४ अधिसुचना,**

**क) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग.क्र.बीसीसी-२०१४/प्र.क्र.२१३/ए/१४/१६-ब दिनांक - ३१/७/२०१४**

**५) ग्राम विकास विभागाकडील शासन परिपत्रक दिनांक ०५ऑगस्ट २०१४ चे पत्रातील नमुद अटी व शर्ती तसेच ग्राम विकास विभागाकडील शासन परिपत्रक दिनांक २१ ऑगस्ट २०१४ नुसार या अंतर्गत नियुक्त झालेला उमेदवार अनुसुचित क्षेत्राच्या बाहेर बदलीपात्र असणार नाही. तसेच सदरहु नियुक्त्या मा.राज्यपाल महोदय यांनी निर्गमीत केलेल्या अधिसूचनेच्या अनुषंगाने करण्यांत येतील / येत आहेत.**

**६) सदरहु पदांची जाहीरात मा. राज्यपाल महोदय यांचे दि. ०९/०६/२०१४ चे अधिसुचनेनुसार प्रसिद्ध करण्यात येत आहे.**

**७) अनुसुचित क्षेत्रातील रिक्त पदे ही स्थानिक उमेदवारांमधून भरणे बाबत बंधनकारक असल्याने केंद्रीय विधी व न्याय मंत्रालय अधिसुचना क्र.जीएसआर/८७६(ई) दिनांक दि. ०२/१२/१९८५ मध्ये नमुद क्षेत्रातील स्थानिक उमेदवाराने भरती साठी अर्ज करावा.**

**८) शासनाचे ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील परिपत्रक क्र.एपिटी-२०१४/प्रक्र.१५३/अस्था-८ दिनांक ०५/०८/२०१४ मधील तरतुदीनुसार स्थानिक अनुसुचित जमाती उमेदवाराची व्याख्या ही पुढील प्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहे.**

**Local Scheduled Tribe candidate means those scheduled tribe candidates who have themselves or whose parents or grandparents have been continuosly residing in the scheduled area of the respective district since 26 jan.1950 till date.**

**नंदुरबार जिल्हयातील** अनुसुचित क्षेत्राबाहेरील (Scheduled Area बाहेरील) **(उमेदवारांनी अर्ज करु नये असे उमेदवार लेखी परिक्षेत उत्तिर्ण झाले तरी ते अपात्र ठरतील.**

**शैक्षणिक अर्हता/अनुभव (अर्ज करते वळी उमेदवाराने सदर अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे)**

| अ. क्र. | पदाचे नांव व वेतन श्रेणी | आवश्यक शैक्षणिक अर्हता | लेखी परीक्षेचा दिनांक | लेखी परीक्षेची वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | **पर्यवेक्षिका**<br>जिल्हा तांत्रीक सेवा (वर्ग ३) अंगणवाडी सेविकेतून निवडीने भरावयाचे.<br>९३००-३४८००+<br>ग्रेड पे ४१०० | माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण व अंगणवाडी सेविका / मदतनीस / बालवाडी शिक्षिका अशी मिळून एकुण १० वर्ष सलग अहर्ताकारी सेवा असणे आवश्यक आहे. त्यासाठी बाल विकास प्रकल्प अधिकारी / गट शिक्षणाधिकारी अशा सक्षम प्राधिकारी यांचा दाखला अनिवार्य राहील. | रविवार<br>दि.०२/११/२०१४ | दुपारी<br>२.०० ते<br>३.३० |
| २. | **आरोग्य सेवक (पुरुष)**<br>(५० % हंगामी क्षेत्र फवारणी कर्मचारी मधुन )<br>५२००-२०२०० + ग्रेड पे २४०० | महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ परिशिष्ट पाच नुसार (२) ज्यांनी भौतीकशास्त्र, रसायनशास्त्र व सामान्यविज्ञान हे विषय घेऊन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उतीर्ण केलेली असेल आणि (३) हंगामी क्षेत्र कर्मचारी की ज्यांनी किमान ९० दिवस हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणुन काम केले आहे. हंगामी क्षेत्र फवारणी कर्मचारी म्हणुन जिल्हा हिवताप अधिकारी यांचा अनुभव दाखला जोडणे अनिवार्य आहे. अर्जा सोबत अनुभव दाखला नसल्यांस अर्ज अपात्र ठरविण्यांत येईल. | शनिवार<br>दि.०८/११/२०१४ | दुपारी<br>२.०० ते<br>३.३० |
| ३. | **आरोग्य सेवक (महिला)**<br>५२००-२०२०० + ग्रेड पे २४०० | महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७परिशिष्ट पाच नुसार (१) आधिपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ४० वर्षापेक्षा अधिक नसेल आणि (२) नूसार ज्यांचे अर्हता प्राप्त सहाय्यकारी प्रसाविका आणि महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमधील नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील. | शनिवार<br>दि.०८/११/२०१४ | दुपारी<br>२.०० ते<br>३.३० |
| ४. | **कंत्राटी ग्रामसेवक**<br>प्रथम ३ वर्षाच्या कंत्राटी पध्दतीवर दरमहा रु.६०००/- मानधन व अधिक, रु.११००/- प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील. | १)आधिपासुन जिल्हा परिषदेच्या सेवेत नसलेले जे उमेदवार ३३ वर्षापेक्षा अधिक वयाचे नसतील आणि,<br>२)उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा तुल्य अर्हता परिक्षेत किमान ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण किंवा शासन मान्य संस्थेची अभियांत्रिकी पदविका (तीन वर्षाचा अभ्यासक्रम) किंवा शासन मान्य संस्थेची समाजकल्याणची पदवी (बी.एस.डब्ल्यु) आणि<br>३)संगणक हाताळणी / वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचलनालयाने वेळोवेळी विहित केलेल्या परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.<br>४)माध्यमीक शाळा प्रमाणपत्र किंवा तुल्य अर्हता आणि कृषी विषयाची पदविका दोन वर्षाचा अभ्यास क्रम धारण करीत असतील अशा उमेदवारांमधुन नामनिर्देशनाने नेमणूक करण्यांत येइल्. मात्र कृषी पदवी किंवा उच्च अहर्ता धारण करणा-या किंवा समाजसेवेचा अनुभव आणि ग्रामीण अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यांत येईल. (महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन पत्र क्र डब्ल्युपीटी-२५११/प्र.क्र. २६४/आस्था-८ दि ०७/१२/२००८ व दि २०/०३/२०१२ अन्वये जुनी व नवीन सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार) | रविवार<br>दि.०९/११/२०१४ | सकाळी<br>१०.०० ते<br>११.३० |

**टिप -पर्यवेक्षीका संवर्ग महिलांसाठीच असल्याने विहीत अहर्ता धारण करणा-या अंगणवाडी सेविका / मदतनीस / बालवाडी शिक्षीका यांतुन केवळ स्थानिक अनु. जमाती प्रवर्गातील महिला उमेदवारांनीच सदर पदासाठी अर्ज सादर करावेत.**

**लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे राहील.**

१) शासन परिपत्रक क्र.एपिटी-२०१४/प्रक्र-१३९/आस्था-८ दि.०५/०७/२०१४ च्या सोबत जोडलेल्या परिशिष्ट `अ` नुसार प्रश्नपत्रिकेचे स्वरुप राहिल.

२) पर्यवेक्षिका (अंगणवाडी सेविकेतून निवडीने) पदासाठी महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग कडील शासन निर्णय क्रं.एबावि-२००५/प्र.क्रं.४६/का-७ मंत्रालय, मुंबई दि.४ मार्च २००५ नुसार वस्तुनिष्ठ स्वरुपाची लेखी परिक्षा ७५ गुणांची व तोंडी परिक्षा २५ घेण्यांत येईल. लेखी परिक्षेत कमीत कमी ३५ गुण प्राप्त करणारे उमेदवार निवडीसाठी पात्र राहतील.

३) लेखी परिक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांना अंतिम निवडीसाठी शैक्षणीक व इतर संबधीत मुळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी वेळीच उपलब्ध करुन द्यावी लागतील अन्यथा निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

४) लेखी परिक्षेसाठी पात्र / अपात्र उमेदवारांची यादी, कागदपत्रे तपासणी / छाननी, लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र व परिक्षेसंबधीत सुचना या केवळ संकेत स्थळावरुनच उपलब्ध करण्यांत येतील. तसेच मोबाईल एसएमएसव्दारे सुचना निर्गमीत करण्यांत येतील. सबब सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रीये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रीयेची माहिती / कार्यक्रमाबाबत अद्ययावत राहण्याची व लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र स्वत:च डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहील.

**५) उमेदवारांनी त्यांच्याकडे असलेल्या मुळ कागदपत्रांवरुन संकेतस्थळावर माहिती भरुन लेखी परिक्षेस बसण्याची संधी प्राप्त करतील. सदर उमेदवार लेखी परिक्षेच्या गुणानुक्रमानुसार पुढील प्रक्रियेसाठी पात्र ठरल्यास त्यांचे मुळ कागदपत्र पडताळणी करतेवेळी सदर कागदपत्रांमध्ये खोटी प्रमाणपत्र/असत्य अथवा चुकीची प्रमाणपत्र आढळल्यांस त्यांच्याविरुध्द भा.द.वि. नुसार फौजदारी गुन्हा इ. कारवाई करण्यांत येईल.**

## वयोमर्यादा :

**अ)** वयोमर्यादे करीता उमेदवाराचे दि.२७/०८/२०१४ रोजीचे वय विचारांत घेतले जाईल.

**ब)**दि.२७/०८/ २०१४ रोजी खुल्या प्रवार्गातील उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे तसेच सामाजीक व समांतर आरक्षणानुसार खालील प्रमाणे वयोमर्यादा विचारात घेण्यात येईल.

| अ.क्रं. | आरक्षण / संमातर आरक्षण | शासन नियमानुसार आरक्षणांकरीता कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | अनु.जमातीचे उमेदवार | **३८ वर्षे** |
| २ | अपंग उमेदवार | **४५ वर्ष** |
| ३ | प्रकल्पग्रस्त | |
| ४ | भुकंपग्रस्त | |
| ५ | सन १९९१ च्या जनगणणा / सन १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी | |
| ६ | अपंग / माजी सैनिक | |
| ७ | स्वातंत्र्य संग्राम सैनिकाचे नामनिर्देशीत पाल्य | |
| ८ | शासकिय कर्मचारी | |
| ९ | अंशकालीन कर्मचारी | **४६ वर्षे** |
| *१०* | *उच्च गुणवत्ता धारक खेळाडु उमेदवार* | ***खुला प्रवर्ग ३८ वर्षे*** |
| | | ***मागासवर्गीय प्रवर्ग ४३ वर्षे*** |
| *११* | आरोग्य सेवक (महिला) | ***४० वर्षे*** |
| *१२* | पर्यवेक्षिका (निवडीने) | अंगणवाडी सेविकामधुन निवडीने भरावयाच्या पदांबाबत ज्या अंगणवाडी सेविकेचे वय ५५ वर्षापेक्षा अधिक नसेल अशाच अंगणवाडी सेविका अर्ज करण्यास पात्र राहतील. |

*माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेतील सवलत, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक मासैक-१०१०/प्र.क्र. २७९/१०/१६अ दि २० ऑगस्ट २०१० प्रमाणे राहील.*

### अतिरिक्त शैक्षणिक अर्हता

१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रं. प्रशासन २०००/प्र.क्रं. ५/२००१/३२,दि. २० जुलै २००२ व अनुषंगीक सुधारित शासन निर्णयान्वये उपरोक्त पदांकरिता अर्ज करणाऱ्या उमदेवारांनी संगणक हाताळणी /वापराबाबतचे खाली नमुद केलेले प्रमाणपत्र **(आवश्यक त्या पदांकरीता )** त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासुन दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्याची सेवा समाप्त होईल.

**अ) D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा**

**ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ , मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा**

**क) माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.)विभागाकडील शासन निर्णय क्रं.मातंस २०१२/प्र.क्रं.२७७/३९ मंत्रालय, मुंबई-३२ दि.४ फेब्रुवारी २०१३ अन्वये नमुद केलेल्या संगणक / माहिती तंत्रज्ञान विषयक परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यांत येईल.**

२) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अनियो/१००५/१२६ सेवा-४ दि.३१ ऑक्टोबर,२००५ नुसार दि.०१ नोंव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल, त्यांना नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. मात्र सद्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सद्या अस्तित्वात असलेल्या सर्वसाधारण भविष्य निवार्ह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.)

**३) माजी सैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर अनुशेष एक वर्ष पुढे ओढण्यांत येवून म.संचालक, सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य , पुणे यांचेकडील नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्याच सामाजिक प्रवर्गातील सर्वसाधारण उमेदवारातून पुढील नवीन भरती वर्षात पद भरण्यांत येईल.**

**४) निवड झालेल्या उमेदवारांना अतिदुर्गम / दुर्गम भागात रिक्त पदी प्रथम पदस्थापना देण्यांत येईल. उमेदवारांनी पदस्थापने बाबत कोणत्याही प्रकारे सक्षम प्राधिका-यांवर दबाव आणल्यांस त्यांचे नाव निवड यादीतुन कमी करण्यांत येईल.**

**५) पर्यवेक्षीका व आरोग्य सेवक (महिला) हया सवंर्गाच्या जागा महिलांसाठीच असल्याने केवळ महिला उमेदवारांनीच सदर पदासाठी अर्ज सादर करावेत.**

***६) लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र व परिक्षेसंबधीत सुचना या केवळ संकेत स्थळावरुनच उपलब्ध करण्यांत येणार असल्याने व मोबाईल एसएमएसव्दारे/ ईमेल व्दारे सुचना निर्गमीत करण्यांत येणार असल्याने उमेदवारांनी सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रीये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रीयेची माहिति / कार्यक्रमाबाबत अद्ययावत राहण्याची व लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करुनप घेण्याची जाबाबदारी संबधत उमेदवाराची राहील.***

**पदांच्या निवडीसाठी कार्यपध्दती, अटी व शर्ती.**

१. जाहिरातीत नमुद संवर्ग निहाय आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहितीच्या आधारे संबधीत उमेदवारांस परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यांत येणार असुन त्या आधारे लेखी परिक्षेत प्राप्त गुणांच्या गुणानुक्रमानुसार पात्र उमेदवारांना त्यांचे मुळ शैक्षणीक व इतर कागदपत्र पडताळणी करीता अंतरीम स्वरुपांत यादी प्रसिध्द करण्यांत येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिति, परिक्षा शुल्क व मुळ कागदपत्रांच्या तपासणीनंतर परिपुर्ण सिध्द होईल अशा उमेदवारांचाच विचार अंतिम निवडीसाठी करण्यांत येईल म्हणून उमेदवारांनी ऑनलाईन माहिती भरतांना कागदपत्रावरुन बिनचुक माहिती भरावी.

२. शासन निर्णय दि २७ जुन २००८ अन्वये लेखी परिक्षेत समान मिळाल्यांस अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम खालील निकषांवर क्रमवार लावला जाईल.

अ) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणीक अहर्ता धारण करणारे उमेदवार ;त्यानंतर
ब) मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत प्रथम अनुसूचीत जमाती मधील नंतर अनुसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुत जाती( १४ व तत्सम जाती, भटक्या जमाती जानेवारी १९९० पुर्वीच्या २८ व तत्सम जमाती) भटक्या जमाती (धनगर व तत्सम ), इतर मागास वर्ग या क्रमाने; त्यानंतर
क) शारीरिक दृष्टया अपग असलेले उमेदवार ; त्यानंतर
ड) माजी सैनिक असलेले उमेदवार ; त्यानंतर
इ) स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य असलेले उमेदवार ; त्यानंतर
ई) वय ( वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारांचा क्रम वरती लागेल)

## परिक्षा शुल्क :

उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने चलनाची प्रत प्राप्त करुन परिक्षा शुल्क भरावयाची आहे.

**मागास प्रवर्ग - १००/-**

माजी सैनिकांना परिक्षा शुल्क माफ आहे.

उपरोक्त प्रमाणे दर्शविण्यांत आलेले परिक्षा शुल्क बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाकडुन प्रक्रिया शुल्क आकारले जाईल. सदर शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे. उक्त परिक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेच्या कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्ज भरतांना प्राप्त झालेल्या चलनाव्दारेच रोखीने भरणे आवश्यक आहे.

## ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत व सर्व पदासाठी समान सुचना -

१. जाहिरांतीत नमुद पदांकरीता फक्त **www.zpndbexam14.org** या अधिकृत संकेत स्थळावरुन विहीत ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्विकारण्यांत येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यांत येणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा / अपुर्ण तसेच मोबईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्या व्दारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यांस त्याची संपुर्ण जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहील. तसेल ई मेल आय डी व मोबाईल संदेश वहनांत येणा-या तांत्रीक अडचणींना जिल्हा निवड समिती, नंदुरबार हे जबादार असणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबादारी स्वत: उमेदवाराची राहील.

२. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्विकारण्यांत येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणीक कागदपत्र व अन्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक नाही तथापि, ऑन लाईन पध्दतीने उमेदवाराने अर्ज सादर करतांना सदर पदासाठीची पात्रता निकष पुर्ण करीत असल्याबाबत खात्री करुन प्रमाणपत्रावरुन बिनचुक माहिती अर्जात भरावी. ऑन लाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यांस किंवा त्रुटी राहील्यांस व भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यांस त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारांस तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणीक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथीलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

३. उमेदवाराची लेखी परिक्षा ही त्यांनी ऑनलाईन अजात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पुर्व तपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे सदर कागदपत्रांच्या तपासणी अगोदर पर्यंत उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतही हक्क राहणार नाही. कागदपत्रांच्या पुर्ण छाननी नंतरच उमेदवारांची पात्रता निश्चीत करण्यांत येईल. लेखी परिक्षेच्या चाळणीनुसार

गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपुर्ण अधिकार जिल्हा निवड समिती, नंदुरबार यांचे जवळ राखून ठेवण्यांत आले आहेत व याबाबत उमेदवारांस कोणतीही तक्रार करता येणार नाही.

४. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना **www.nandurar.nic.in व www.zpndbr.in तसेच** www.zpndbexam14.org या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरतांना स्टेटबँक ऑफ इंडिया बँकेत फी भरण्यासाठी चलन २ प्रतिमध्ये (उमेदवाराची प्रत, बँकेची प्रत ) उपलब्ध होईल. सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवाराने चलनांत नमुद असलेली आवश्यक ती फी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरावी व सदरच्या दोन प्रतिपैकी उमेदवारांस त्याची स्वतःची प्रत बँकेकडुन परत मिळेल सदर सदर चलनाच्या प्रतिवर बॅकेकडुन मिळालेला **Transation ID उमेदवाराने पुनश्च लॉगइन करुन Transation ID अपडेट करावा.** बँकेत परिक्षा शुल्क भरण्याचा कालावधी हा दि.०१/०९/२०१४ ते दि.१९/०९/२०१४ असा असुन **Transation ID अपडेट करण्याचा कालावधी दि २३/०९/२०१४ रोजी सायं. ०५.०० वा. पर्यंत राहील.**

५. उमेदवाराने स्टेट बॅक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत पैसे भरल्यानंतर उमेदवाराला त्याची स्थिती **www.zpndbexam14.org** या संकेतस्थळावर पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पाहता येऊ शकेल.

६. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराने स्वतःचा अद्ययावत (Latest) विहीत नमुन्यातील पासपोर्ट साईझ फोटो व सही स्कॅन करुन **www.zpndbexam14.org** संकेतस्थळावरील सूचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.

७. ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

८. ऑनलाईन अर्ज प्रक्रीयेच्या सर्व टप्प्यांतील माहिती परिपुर्ण भरुन विहीत परिक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परिक्षेची रुपरेषा/ वेळापत्रक/ परिक्षा केंद्र/ बैठक क्रमांक इ. बाबतची माहिती वर दिलेल्या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यांत येईल. या संबधीत स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रीयेची माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

९. अपंग संवर्गातील उमेदवाराकडेस अपंगत्वा बाबत आवश्यक ते प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. शासन परिपत्रक दि १८/०३/२०१४ अन्वये अपंग उमेदवारांस लेखनिकाची मदत आवश्यक असल्यांस ऑनलाईन अर्ज भरतांना तसा स्पष्ट उल्लेख करावा. लेखनिकाची परिक्षा शुल्क रक्कम रु. १००/- ही चलनाव्दारे परिक्षा शुल्कामध्ये वाढ करुन त्या प्रमाणे भरावी लागेल व ती नापरतावा राहील. ज्या उमेदवारांनी लेखनिकाची अर्जात मागणी केलेली नसेल अशा अपंग उमेदवारांना ऐन वेळेस लेखनिक पूरविला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. अपंग प्रवर्गातील पात्र उमेदवारांची अंतिम नियुक्ती ही स्थायी वैद्यकिय मंडळाच्या प्रमाणपत्राच्या आधारेच करण्यांत येईल.

१०. ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे, सेवा योजन कार्यालय, समाज कल्याण, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयांत नावे नोंदविली आहेत अशा उमेदवारांना विहीत मुदतीत स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे व परिक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन अशा उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारांत घेतले जाणार नाहीत. अशा उमेदवारांना कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

११. अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडूसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय व शिक्षणं विभाग क्रं.रक्रिधो-२०००-प्रक्रं-६८-क्रियुसे-२ दि.३० एप्रिल २००५ मधील तरतूदीनुसार खेळाडूसाठी राखीव असलेल्या पदावर निवडीसाठी अर्हता पुढीलप्रमाणे असेल. सदर पदासाठी त्या त्या खेळाच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रिडा स्पर्धामध्ये किमान राज्य अंजिक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रोप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू राज्य अजिक्यपद स्पर्धा या सदराखालील खेळांच्या महाराष्ट्र ऑलंपिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यांत. तसेच भारतीय खेळ प्राधिकरणाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय, शालेय स्पर्धामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान प्राप्त करणारा खेळाडू. असे उपरोक्त नमूद केलेप्रमाणे खेळाडूच्या आरक्षित जागेसाठी पात्र ठरतील. खेळाडूच्या आरक्षीत पदावर नेमणूकी करीता ज्या खेळाडूची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे संचालक, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या कार्यालयाकडे तपासणीसाठी पाठविणेत येवून सदर प्रमाणपत्र वैध ठरल्यानंतरच सदर उमेदवारांना नेमणूक देण्यांत येईल.

१२. शासन निर्णय दि २७ ऑक्टोंबर २००९ अन्वये पदविधर / पदविकाधारक अंशकालीन या समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी `` सुशिक्षीत बेरोजगार`` या योजने अंतर्गत शासकिय कार्यालयामध्ये तीन वर्ष काम केल्याचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र व रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये सदर अनुभवानची नोंद केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे व तशी नोंद ऑनलाईन अर्जात नमुद करणे आवश्यक आहे. सदर

प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारांना कागदपत्र पडताळणीचेवेळी सादर करणे आवश्यक आहे.

१३. सेवायोजन कार्यालय, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त होणाऱ्या जनगणना कर्मचारी, अंशकालीन कर्मचारी, प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, जिल्हा सैनिक कल्याण बोर्ड करुन शिफारस होणाऱ्या उमेदवारांनी त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार विहीत नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

१४. प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांनी संबंधित जिल्हयातील मा.जिल्हाधिकारी / जिल्हा पुर्नवसन अधिकारी यांच्याकडील प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त प्रमाणपत्राची मुळ प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवयक आहे.

१५. अनुभवाच्या बाबतीत मासिक, नियतकालीक, अंशकालीक, विद्यावेतन, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेला अंशकालीक सेवेचा कालावधीत तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही.

१६. **सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रं.बीसीसी २०११/प्र.क्रं.१०६४/२०११/१६-ब दिनांक १२ डिसेंबर २०११ नुसार मागासवर्गीय उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील. दि १२/१२/२०११ अन्वये निवड यादीत निवड झालेल्या उमेदवारांकडेस जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास ०६ महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील व विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यांस संबधीत उमेदवारांना सेवेतुन कमी करण्यांत येईल.**

१७. माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत सैन्यात काम केल्या बाबतचे आवश्यक कागदपत्र व जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केले असल्या बाबत प्रमाणपत्र व सेवा तपशील दर्शविणारे अभिलेख प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्राची सक्षम अधिका-याकडुन पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यांत येणार नाही.

१८. माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये युध्द काळात व युध्द नसतांना सैनिक सेवेत मृत्यू झालेल्या किंवा अपंगत्व येवून त्यामुळे नौकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटूंबातील फक्त जवानाची पत्नी किंवा अपंग जवानाची पत्नी यांना नियुक्त देणेचे धोरण आहे. व त्यानंतर त्याची अविवाहीत मुलगी / अविवाहीत मुलगा यांचा समावेश आहे. व त्यांचा १५% समांतर आरक्षणातून विचार करणेत येईल.

१९. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. (डोमेसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. किंवा त्याचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा दाखला सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात डोमसाईल प्रमाणपत्राची अट लागू रहाणार नाही. तसेच सदर परिक्षार्थीकडे जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या परिक्षार्थीने शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहिल. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद आवश्यक आहे. उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परिक्षार्थींना लागू राहतील.

२०. भूकंपग्रस्त / प्रकल्प ग्रस्त उमेदवारांनी शासन नोकरी मिळणे बाबत सक्षम अधिकारी यांचे विहीत प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

२१. शासकिय / निमशासकिय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या संबधित नियुक्ती प्राधिकरणाच्या परवानगीने भरावयाचा आहे. अश्या परवानगी पत्राची प्रत कागदपत्र पडताळणीचे वेळी उमेदवाराकडेस असणे आवश्यक आहे.

२२. सदर जाहिरातीत नमुद काही संवर्गाची रिक्त पदे ही माहे एप्रिल २०१५ अखेर रिक्त होणारी दर्शविलेली असल्याने सदरची पदे जसजशी रिक्त होतील त्यानुसार अंतिम निवड यादीतील जेष्ठतेनुसार नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही करण्यांत येईल.

२३. सामान्य प्रशासन विभागाकडील अधिसुचना क्र एस आर व्ही २०००/ प्रक्र १७/२०००/१२ दि २८ मार्च २००५ व शासन परिपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र १७/२००० दि. ०१ जुलै २००५ अन्वये विहीत केले नुसार लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र नमुना `अ` भरणे आवश्यक आहे. अर्हता म्हणून भरणे आवश्यक आहे. उमेदवार अविवाहीत असल्यांस ऑनलाईन अर्जात याबाबत स्पष्ट उल्लेख करावा.

२४. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षस बसण्याचा / कागदपत्र पडताळणीस बोलविणचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अहर्ता धारण न करणारा आढळल्यांस खोटी माहिती पुरविल्यांस अथवा एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्षरित्या दबाव आणला अथवा गैर प्रकारचा अवलंब केल्यांस त्यांस निवड प्रक्रियेतुन बाद करण्यांत येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यांस कोणतीही पूर्व सुचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल व त्यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाइ करण्यांत येईल.

२५. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनांस आल्यांस तया उमेदवारांची उमेदवारी / नियुक्ती रद्द करण्यांत येईल व शासनाची दिशाभूल केल्या प्रकरणी सदर उमेदवारां विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल.

२६. महिला, खेळाडू, अपंग, माजी सैनिक, अंशकालीन कर्मचारी, प्रकल्पग्रस्त, इ. या समांतर आरक्षणाच्या पदांच्या बाबतीत आवश्यक ती सर्व संबंधीत कागदपत्रे/ प्रमाणपत्रे तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णयांमधील तरतुदीनुसार माजीसैनिक उमेदवाराने माजी सैनिक समांतर आरक्षणाचा पुर्वी लाभ घेवून शासकिय नोकरी स्विकारली असेल तर पुन्हा समांतर आरक्षणाचे लाभांस पात्र राहणार नाही. तसेच अंशकालीन उमेदवाराने एकदा समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यांस त्याच उमेदवारांस पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही. तसे आढळल्यांस कोणत्याही वेळी निवड रद्द करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

२७. सदर पदांची निवड प्रक्रिया ही महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक दि.१३ ऑगस्ट २०१४ नुसार निवड यादया तयार करणेत येवून उमेदवारांची निवड करण्यांत येईल.

२८. चारित्र्य-पुर्वचारित्र्य पडताळणी अंती आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास संबधीत उमेदवार नियुक्तीसाठी / सेवेसाठी पात्र राहणार नाही. तसेच कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील.

२९. निवड झालेल्या उमेदवाराना आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्र / हमीपत्र इ. यांची पुर्तता करुन देणे आवश्यक राहील तसेच त्या प्रमाणपत्रांची पडताळणी विहीत पध्दतीनुसार करुन घेणे बंधनकारक राहील. सेवेत नियुक्त होणा-या उमेदवारांना नियमानुसार आवश्यक ती परिक्षा / प्रशिक्षण विहीत मुदतीत उत्तीर्ण / पुर्ण करणे आवश्यक राहील.

३०. बिंदू नामावली नोंदवही सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्षाकडून पडताळणी नंतर पदसंख्येत बदल होणेची शक्यता आहे. त्यानुसार रिक्त पदे भरणेची कार्यवाही केली जाईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३१. माजी सैनिक व अपंग उमेदवार वगळता समांतर आरक्षणाच्या पदांसाठी समांतर आरक्षणा प्रमाणे उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच प्रवर्गातील सर्वसाधारण उमेदवारातुन गुणानुक्रमे निवड करण्यांत येईल.

३२. विधानसभा निवडणूक आचार संहितेबाबत निश्चीत कालावधी नसल्याने परिक्षेच्या वेळापत्रकात बदल झाल्यास याबाबत **www.nandurar.nic.in** व **www.zpndbr.in** तसेच **www.zpndbexam14.org** या संकेतस्थळावर सूचना प्रसिध्द करण्यांत येईल उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळाचे अवलोकन करावे.

३३. अपरिहार्य कारणास्तव अथवा नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा शासन आदेशाने विहीत दिनांकास लेखी परिक्षा घेणे शक्य नसेल तर शासन ठरवून देईल त्याप्रमाणे सोईच्या दिवशी लेखी परिक्षा घेणेत येईल याबाबत वृत्तपत्राद्वारे/संकेतस्थळावर/ ईमेल / मोबाईल एसएमएस व्दारे कळविणेत येईल.

३४. लेखी परिक्षेस व कागदपत्र पडताळणीस उमेदवारांस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

३५. वरील अटी, शर्ती, नियमांव्यतिरिक्त शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश व निर्णय लागु राहतील.

३६. सदर भरती प्रक्रीयेसंदर्भात जिल्हा निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

३७. जाहिरातीमधील काही मुद्दे शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहिल.

रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | भरती प्रक्रिया कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १. | अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी | **दिनांक-01/09/2014** रोजी **सकाळी 10.00** वाजेपासून ते **दि.20/09/2014** रोजी **सायंकाळी 05.30 वाजे पर्यंत.** |
| २. | बॅंकेत विहीत चलनाव्दारे परिक्षा शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक | **दि.19/09/2014** |
| ३. | Transaction ID Update करावयाचा अंतिम दिनांक | **दि.23/09/2014** |

## विशेष सुचना-

- या परिक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना उमेदवाराना कोणतीही कागदपत्रे सादर करावयाची आवश्यकता नाही परंतु समक्ष कागदपत्र पडताळणी नंतरच उमेदवारांची निवड अंतिम करण्यांत येणार असल्याने ज्या उमेदवाराने सदर पदाकरीता आवश्यक असलेली शैक्षणीक व इतर पात्रता धारण केली असेत अशाच उमेदवारांनी अर्ज सादर करावेत आवश्यक पात्रता पुर्ण न करणा-या उमेदवारांनी विनाकारण अर्ज करु नयेत.
- अर्जदारांना अर्ज भरण्या संदर्भात काही अडचणी आल्यांस त्यासाठी त्यांनी खालील भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

**१) ९७६४११४१८३ २) ७०८३४३०३६८ ३) ७०८३४७२८५६**

**स्वाक्षरीत/-**
**सदस्य**
**जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा परिषद, नंदुरबार**

**स्वाक्षरीत/-**
**सदस्य**
**जिल्हा निवड समिती तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी(बा.वि.)**
**जिल्हा परिषद, नंदुरबार**

**स्वाक्षरीत/-**
**सदस्य**
**जिल्हा निवड समिती तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रा.पं.)**
**जिल्हा परिषद, नंदुरबार**

**स्वाक्षरीत/-**
**सदस्य**
**जिल्हा निवड समिती तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, नंदुरबार**